
रत्नाकर मतकरी

Ratnakar Matkari




रत्नाकर मतकरी













रत्नाकर रामकृष्ण मतकरी

जन्म : १७ नोव्हेंबर १९३८, मुंबई

शिक्षण : एल्फिस्टन कॉलेज, मुंबई
अर्थशास्त्रात पदवी (१९५८).

नोकरी : बँक ऑफ इंडियामध्ये. १९७८ पर्यंत.
नंतर पूर्ण वेळ लेखन, दिग्दर्शन, निर्मिती.

प्रथम प्रसिद्धी

एकांकिका 'वेडी माणसं' –
आकाशवाणी, मुंबई केंद्र. १४ फेब्रुवारी १९५५.

दिग्दर्शन

३५ नाटके (१८ प्रौढांसाठी, १७ मुलांसाठी),
१४ एकांकिका, २ लघुपट, ४ चित्रमालिका,
१ चित्रपट.

निर्मिती संस्था

बालनाट्य (१९६२), सूत्रधार (१९७०),
महाद्वार (१९८७)

प्रकाशित पुस्तके (पुनर्संकलने सोडून): ११२
३९ नाटके, १३ एकांकिका संग्रह
(८० एकांकिका), २० कथासंग्रह (२५० कथा),
३ कादंबऱ्या, ९ ललित लेख संग्रह,
३ वैचारिक लेख संग्रह, १६ बालनाटके,
५ बालनाटिका संग्रह (२१ नाटिका),
१ बालकथा संग्रह (६ कथा), १ बालगीत
संग्रह, १ आत्मचरित्रात्मक, १ काव्यसंग्रह.

अप्रकाशित पुस्तके


२५ नाटके, ६ बाल नाटके, १ बाल नाटिका,
१ लेख संग्रह.

कार्यक्रम

- मुंबई दूरदर्शनवरील अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम 'गजरा' याचे सूत्रसंचालन व अंशत: लेखन – २ वर्षे (१९७६ ते १९७८) तसेच 'शरदाचे चांदणे' या साहित्यिक मुलाखतींच्या कार्यक्रमात संचालन व मुलाखतकार – १३ भाग.
- 'कथादर्शन' : गूढकथांवर आधारित एक पात्री कार्यक्रमाचे भारत, मस्कत व अमेरिका येथे मिळून ५० प्रयोग.
- प्रतिभाबरोबर 'सांगाती' या अभिवाचनाचे भारतात व परदेशी प्रयोग.
- 'माझी नाटके... माझे नायक' या एकल कार्यक्रमाचे प्रयोग मुंबई व मस्कत येथे.
- मुलांसाठी 'अद्‌भुताच्या राज्यात' हा एकपात्री कार्यक्रम.
- आकाशवाणी मुंबई केंद्रावर 'मध्यरात्रीचे पडघम' या, स्वत:च्या गूढकथांवर आधारित १३ भागांच्या मालिकेत कथा वाचन.
- 'माणसाच्या गोष्टी' या कथा वाचनाचे कार्यक्रम मुंबई व अमेरिका येथे.
- अनेक सभांमध्ये व्याख्याने. जाहीर कार्यक्रमात, आकाशवाणी व दूरचित्रवाणी यांवर, अनेक मुलाखती.

अभिनय

'प्रेमकहाणी', 'विनाशाकडून विनाशाकडे',
'लोककथा '७८', 'साटंलोटं', या शिवाय अनेक
बालनाट्ये आणि एकांकिका यांमधून.




हिमालयवासी गुरुच्या
गुरु दत्त
अन्वर्थ
S. K. DESAI ESSAYS
EDITED BY


१९५५ मध्ये, त्यांच्या वयाच्या सतराव्या वर्षी, रत्नाकर मतकरी यांची एकांकिका 'वेडी माणसं' ही, आकाशवाणी मुंबई केंद्रावरून ध्वनिक्षेपित झाली. तेव्हापासून आजतागायत अव्याहतपणे त्यांचे लेखन चालू आहे. आज वयाची ७९ वर्षे ओलांडल्यानंतरही त्यांचे नवे लिखाण वाचावयास मिळते. त्यांची भाषणे ऐकावयास मिळतात, त्यांची नवीन नाटके रंगभूमीवर येतात, आणि नवीन पुस्तके प्रकाशित होतात, हे या प्रदीर्घ, सातत्यपूर्ण, समृद्ध कला-कारकिर्दीचे वैशिष्ट्य. साहित्यिक, संपूर्ण रंगकर्मी, दूरदर्शन-चित्रपट या माध्यमातील लेखक-दिग्दर्शक, निर्माता, स्वयंशिक्षित चित्रकार, असे त्यांच्या कलावंत व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आहेत.

नाटक, एकांकिका, बालनाट्य, कथा, कादंबरी, ललित लेख, वैचारिक लेख अशा नानाविध साहित्य प्रकारात त्यांनी दर्जेदार लेखन केले. मराठी रंगभूमीवरील नव्या पर्वाच्या जडण-घडणीतले एक शिल्पकार, असे त्यांचे सार्थपणे वर्णन करता येईल. व्यावसायिक, प्रायोगिक आणि बालनाट्य अशी रंगभूमीची तिन्ही दालने हे त्यांचे कार्यक्षेत्र राहिले. तिथली त्यांची कामगिरी, नाट्यलेखन, दिग्दर्शन, नेपथ्य आणि संगीत यांचे संकल्पन, वेशभूषा रेखाटन, अभिनय, तसेच निर्मिती अशी सर्वांगीण स्वरूपाची आहे. 'बालनाट्य', 'सूत्रधार' आणि 'महाद्वार' या आपल्या नाट्य संस्थांच्या द्वारे त्यांनी, प्रतिभा मतकरी या कलावंत पत्नीच्या साहाय्याने रंगभूमीच्या क्षेत्रात केलेले निरपेक्ष, निष्ठापूर्ण कार्य लक्षणीय आणि मोलाचे आहे. त्यांचे चित्रकार असणे ही गोष्ट साहित्य, रंगभूमी आणि इतर कला माध्यमे, यातील त्यांच्या निर्मितीसाठी लाभदायक ठरली आहे.

प्रयोगशीलता, निर्मितीची अथक ऊर्जा, चैतन्य, उपक्रमशीलता, तसेच अंतर्मुखता आणि समाजाभिमुखता यांचे संतुलन, हे मतकरींच्या कलावंत-व्यक्तिमत्त्वाचे खास विशेष आहेत. कमीत कमी साधनांच्या आधारे निर्मिती करणे आणि त्या द्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणे, हेही त्यांच्या सृजनशीलतेचे एक मर्म आहे.

कलावंत मतकरींना आजवर अनेक पुरस्कार व मानसन्मान लाभलेले आहेत. तथापि मराठी (आणि अन्य भाषिक) रसिकांनी मतकरींच्या साहित्यावर जो लोभ केला, तो त्यांना मिळालेला सर्वाधिक मोलाचा पुरस्कार म्हणता येईल. त्यांची 'दुभंग', 'अश्वमेघ', 'माझं काय चुकलं?', 'जावई माझा भला', 'घर तिघांचं हवं!' 'खोल खोल पाणी' ही नाटके नाट्य रसिकांच्या मनात कायम घर करून आहेत. 'चार दिवस प्रेमाचे' या संगीत नाटकाचे १००० च्या वर प्रयोग झाले, आणि हिंदी व गुजराती भाषांमध्येही ते यशस्वी झाले. तसेच, अलिकडच्या 'सुखान्त' या नाटकाचे गुजराती रुपांतर 'वारस' हेही अत्यंत यशस्वी ठरले. समांतर रंगभूमीवर 'प्रेमकहाणी' आणि 'आरण्यक' यांना मानाचे स्थान मिळाले, तर 'लोककथा '७८' हे, आशय, आकार इत्यादी अनेक कारणांसाठी महत्त्वाचे ठरले. मराठी आणि हिंदी भाषांत त्यांचे प्रयोग अजूनही होत असतात. 'निम्माशिम्मा राक्षस', 'अलबत्या गलबत्या', 'अचाट गावची अफाट मावशी' या बाल नाटकांशी दोन पिढ्यांचे बाल्य निगडित आहे. वास्तवाचे भान ठेवणाऱ्या गूढकथा, हा कथाप्रकार वाचकांपर्यंत त्यांनी एकहाती पोहोचवला. वयाच्या सोळाव्या वर्षापासून अथकपणे कार्यरत राहिलेला हा लेखक - दिग्दर्शक, हे मराठी साहित्य आणि रंगभूमी या दोन्हींना कवेत घेणारे एक अपवादात्मक बहुरंगी व्यक्तिमत्त्व आहे.

नाटके, अनुवाद, नाट्य रूपांतरे, एकांकिका ...



एकूण ७० नाटके

(पुस्तकरुपाने प्रकाशित)

१. वाऱ्यावरचा मुशाफिर
२. वर्तुळाचे दुसरे टोक
३. ब्रह्महत्या
४. बिऱ्हाड बाजलं
५. प्रेमकहाणी
६. आरण्यक
७. समोरच्या घरात
८. लोककथा '७८
९. अजून यौवनात मी
१०. अश्वमेध
११. दुभंग
१२. चि. सौ. कां. चंपा गोवेकर
१३. माझं काय चुकलं?
१४. जोडीदार
१५. निखारे
१६. स्पर्श अमृताचा
१७. कर्ता करविता
१८. खोल...खोल पाणी
१९. अग्निदिव्य
२०. वटवट सावित्री
२१. सत्तांध
२२. कार्टी प्रेमात पडली
२३. विठो रखुमाय
२४. तुमचे अमुचे गाणे
२५. घर तिघाचं हवं
२६. जावई माझा भला
२७. बकासूर!
२८. प्रियतमा
२९. साटं लोटं
३०. शू ऽऽ कुठं बोलायचं नाही!
३१. एकदा पाहावं करून!
३२. चार दिवस प्रेमाचे
३३. तन-मन
३४. जादू तेरी नजर
३५. दादाची गर्लफ्रेंड
३६. आम्हाला वेगळं व्हायचंय!
३७. ज्याचा शेवट गोड...
३८. महाराष्ट्राचं चांगभलं
३९. इंदिरा

नाटके : (रंगभूमीवर आलेली परंतु अद्यापि पुस्तकरूपाने अप्रकाशित)

राज्य नाट्य स्पर्धेतील व समांतर रंगभूमीवरील :

४०. खेळ दो जिवांचा
४१. मागे वळून पाहू नकोस
४२. म्हणे खून मी केला!
४३. खरं म्हणा, वा खोटं
४४. साता समुद्रापार
४५. शापित
४६. विनाशाकडून विनाशाकडे
४७. चुटकीचं नाटक
४८. गणेश गिरणीचा धैकाला
४९. भंकस
५०. नगरी अंधेरा





५१. उद्‌गार!

५२. मेजवानीचा फार्स

व्यावसायिक

५३. माझ्या बायकोचा मुलगा

५४. अंधार माझा सोबती

५५. राजा, इष्काची रात्र आहे! (लोकनाट्य)

५६. नरू आणि जान्हवी (आंदोलन)

५७. ती...तीच ती!

५८. सुपरहिट नं. १.

५९. पाच पांडवाचा बाप

६०. साहेबजी, डार्लिंग!

६१. इथं हवंय कुणाला प्रेम?

६२. सुखान्त

अनुवाद

प्रौढांसाठीच्या व मुलांसाठीच्या अनेक नाटकांचे हिंदी व गुजराती भाषांत अनुवाद. त्यापैकी 'प्रेमकहाणी', 'दुभंग', 'घर तिघाचं हवं!' व 'अदृश्य माणूस' (सर्व हिंदी) आणि 'आरण्यक' (गुजराती) हे पुस्तक रूपाने प्रकाशित.

नाट्य रूपांतरे

६३. व्यक्ती आणि वल्ली

६४. असा मी असा मी

६५. अशी बायको हवी!

नाटके (अजून रंगभूमीवर यावयाची)

६६. संभ्रम

६७. काळी राणी

६८. जगाला नाही रे मंजूर

६९. तुळसा

७०. गांधीजी : अंतिम पर्व

एकांकिका संग्रह.

१. रत्नाकर मतकरी यांच्या सात एकांकिका

२. एकाच मातीची खेळणी

३. लाल गुलाबांची भेट

४. शय्या

५. अंधारवाडा

६. पोर्ट्रेट आणि २ एकांकिका

७. यक्षिणी आणि ४ एकांकिका

८. आठ खुर्च्या आणि काळोख

९. अस्वस्थ रात्र

१०. मी एक अभिमन्यू

११. चुकभूल द्यावी घ्यावी

१२. जस्ट अ पेग!

१३. चोर आणि चांदणं





कथा, कादंबऱ्या, ललित, वैचारिक, आत्मचरित्रात्मक ...



कथासंग्रह

१. खेकडा
२. निजधाम
३. सोनेरी मनाची परी (स्वप्नातील चांदणे)
४. फाशी बखळ
५. कबंध
६. रंगांधळा
७. संभ्रमाच्या लाटा
८. मध्यरात्रीचे पडघम
९. मृत्युंजयी
१०. दहाजणी
११. एक दिवा विझताना...
१२. संदेह
१३. ऐक...टोले पडताहेत!
१४. अंश
१५. हसता हसविता
१६. रंगयात्री
१७. बारा पस्तीस
१८. निर्मनुष्य
१९. अंतर्बाह्य
२०. इन्व्हेस्टमेंट

पुनर्संकलित कथासंग्रह

१. रत्नाकर मतकरींच्या निवडक गूढकथा
२. फँटॅस्टिक
३. अवचिन्ह
४. विलक्षण
५. अपरात्र
६. झपाटणाऱ्या गोष्टी
७. गहिरे पाणी
८. बाळ, अंधार पडला
९. रत्नाकर मतकरी यांच्या श्रेष्ठ कथा – १
१०. रत्नाकर मतकरी यांच्या श्रेष्ठ कथा – २

१० कथांचे गुजराती अनुवाद

नियतकालिकांतून प्रकाशित
(अनुवादक : व्रज शहा)

७ कथांचे संस्कृत अनुवाद

मासिकांतून प्रकाशित
(अनुवादक : अलका रानडे)

कादंबऱ्या

१. जौळ
२. पानगळीचं झाड
३. ॲडम

काव्यसंग्रह

१. हे काही शब्द...

ललित लेख-संग्रह

१. सहज
२. रंगत
३. गोंदण
४. सोनेरी सावल्या
५. शांततेचा आवाज
६. शब्द... शब्द...शब्द!
७. तृप्त मैफल
८. सादर सप्रेम
९. परदेशी

पुनर्संकलित ललित लेखसंग्रह

१. माणसाच्या गोष्टी
२. माणसाच्या गोष्टी-२

वैचारिक लेख संग्रह

१. कायमचे प्रश्न
२. रंग-रूप : रंगभूमी चिकित्सा
३. रस-गंध : आस्वादक समीक्षा

आत्मचरित्रात्मक

१. माझे रंगप्रयोग

मतकरींविषयी

१. 'रत्नाक्षरं' - रत्नाकर मतकरी : व्यक्ती आणि साहित्य

संपादन

१. मराठी एकांकिका (साहित्य अकादमी, सहसंपादक : सुधा जोशी)
२. मुलांचे नाटक (नॅशनल बुक ट्रस्ट)
३. पॉझिटिव्ह (म. रा. एड्स नियंत्रण संस्था)
४. कलेपासून कलेकडे (प्रभाकर कोलते यांचा चित्रकला विषयक लेखसंग्रह).
५. सूत्रधार (नाट्यविषयक अंक) नोव्हेंबर १९७१
६. ललित (अतिथी संपादक, नाट्य विशेषांक) मे-जून १९८८

चित्रमालिका

(लेखन-दिग्दर्शन-निर्मिती)

१. बेरीज वजाबाकी
२. गहिरे पाणी

(लेखन-दिग्दर्शन)

१. काम फत्ते!
२. अश्वमेध

(लेखन)

१. व्यक्ती आणि वल्ली
२. मी - एक बंडू!

चित्रपट

(लेखन-दिग्दर्शन-निर्मिती)

१. इन्व्हेस्टमेंट







आगामी चित्रपटाचे संवाद :

१. भाई : व्यक्ती की वल्ली?
दिग्दर्शन -महेश मांजरेकर
पटकथा - गणेश मतकरी



एकूण २२ नाटके (मुलांसाठी)
(पुस्तकरूपाने प्रकाशित)

१. मधुमंजिरी
२. कळलाव्या कांद्याची कहाणी
३. निम्माशिम्मा राक्षस
४. गाणारी मैना
५. अचाटगावची अफाट मावशी
६. अदृश्य माणूस
७. राक्षसराज झिंदाबाद!
८. इंद्राचे आसन, नारदाची शेंडी
९. अलबत्या गलबत्या
१०. धि ग्रेट गोल्डन गँग
११. सावळ्या तांडेल
१२. धडपडे, बडबडे, मारकुटे आणि मंडळी
१३. शाबास लाकड्या!
१४. चमत्कार झालाच पाहिजे!
१५. सरदार फाकडोजी वाकडे
१६. यक्षनंदन

नाटके (मुलांसाठी)
(रंगभूमीवर आलेली, परंतु अद्यापि पुस्तक रूपाने अप्रकाशित)

१७. आटपाट नगरची राजकन्या
१८. अलिबाबाचे खेचर आणि ३९ वा चोर
१९. अलल् घुर्र घुर्रर्र !!
२०. ढग ढगोजीचा पाणी प्रताप
२१. माकडा, माकडा हुप्!
२२. २ बच्चे २ लुच्चे

एकांकिका संग्रह (मुलांसाठी)

१. राजकन्येची सावली हरवली आणि २ नाटिका
२. कहाणी कोरड्या गाभाऱ्याची / नवी मैत्रीण
३. वेडपट नाटक/ मुले राज्यकारभार पाहतात / धाकूचं नशीब
४. चटकदार ५ + १
५. रंगतदार ६ + १.

बालकथा संग्रह : भूत – अद्‌भुत
बालगीत संग्रह : गाऊ गाणे गमतीचे













नीटनेटकं, सुव्यवस्थापित (organised) असणं, हे मतकरींच्या कार्यशैलीचं, मुळात मानसिक धाटणीचं वैशिष्ट्य आहे. त्यातून स्वाभाविकपणेच येते ती शिस्त. विचारातली, विषयातली, लिहिण्यातली, एकूण निर्मितीतलीच.

- प्रा. डॉ. सुधा जोशी

मतकरींनी माझ्यातला दिग्दर्शक घडवला आणि संपन्नदेखील केला. सध्याच्या काळात समृद्ध आणि शिस्तबद्ध नाटककारांची वानवा असताना, पन्नासहून अधिक वर्षे सातत्याने आणि शिस्तीने, सामाजिक भान जागृत ठेवून, चौफेर आणि सकस अशी रंगनिर्मिती केल्याबद्दल या माझ्या ज्येष्ठ मित्राला सलाम.

- विजय केंकरे, दिग्दर्शक

मतकरींची दिग्दर्शनाची पद्धत वेगळी आहे. चित्रकार जसा हळूहळू तपशील, रंग भरत चित्र पूर्णत्वाला नेतो, तसं त्यांचं दिग्दर्शन असतं. चहुबाजूंनी आणि अनेक रंगांनी भरत, घडत जाणाऱ्या नाटकाचा प्रभाव नटाच्या तयारीवर, भूमिकेवरही होतो. त्यांच्याबरोबर केलेल्या नाटकांच्या तालमी म्हणजे अत्यंत आनंददायी अनुभव होता.

- दिलीप प्रभावळकर, ज्येष्ठ अभिनेते, लेखक

रत्नाकर मतकरी हे एक सिद्धहस्त कथाकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या प्रकारच्या कथा मराठी भाषेच्या संबंधात तरी निदान दुर्मिळ आहेत. या कथा अशा योग्यतेच्या आहेत, की त्याचे अन्य भाषांतून अनुवाद झाले, तर ते केवळ मतकरींचेच प्राप्त यश वृद्धिंगत करतील, असे नव्हे; तर ते परिणामी मराठी भाषेलाही ललामभूत ठरतील.

-माधव मनोहर, ज्येष्ठ समीक्षक

अत्यंत सहजपणे, नकळतपणे आणि तरलतेने जेव्हा सांगण्यासारखं जे काही असतं, त्याची आणि कलात्मकतेची अभेद्य सांगड घातली जाते, तेव्हाच ती कलाकृती म्हणून श्रेष्ठ गणली जाते. ही किमया साध्य करणं सर्वच सर्जकांना शक्य नसतं. दुर्मिळ असं हे कौशल्य नाटककार रत्नाकर मतकरी यांना उत्तमरीत्या साध्य झालं आहे.

- कमलाकर नाडकर्णी, ज्येष्ठ समीक्षक

'इन्व्हेस्टमेंट'

- **'इन्व्हेस्टमेंट' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट २०१२ हा राष्ट्रीय पुरस्कार**
- **हे मतकरींचे पहिलेच चित्रपट दिग्दर्शन**
- **गणेश मतकरी याचे सहदिग्दर्शन व सुप्रिया विनोद हिची नामांकित प्रमुख भूमिका**
- **'महाद्वार'साठी निर्माती : प्रतिभा मतकरी, सहनिर्माते : मंदार वैद्य व अनिश जोशी**








चैतन्य







इतर कार्य व सन्मान

- जस्टिस ऑफ पीस (१९७२)
- आकाशवाणीच्या सल्लागार मंडळावर (१९८८-९१)
- चित्रपट सेन्सॉर बोर्डाचे सदस्य (१९९०-९२)
- 'निर्भय बनो आंदोलना'चे काही काळ अध्यक्ष (१९९५)
- साने गुरुजी स्मारक समितीचे उपाध्यक्ष (१९९८-२००७)
- नर्मदा बचाओ आंदोलनासाठी 'तुम्ही तिथं असायला हवं' या वाचनाचे ५० प्रयोग. तसेच आंदोलनविषयक १५ तैलचित्रांची मालिका.
- 'वसंत सोमण मित्रमंडळा'च्या वतीने, रंगभूमीला वेगळे योगदान देणाऱ्या व्यक्तींना, १९९७ पासून वार्षिक स्मृती पुरस्कार प्रदान.
- झोपडपट्टीवासियांना नाट्य माध्यमातून व्यक्त होता यावे, यासाठी समता विचार प्रसारक संस्था, ठाणे यांच्या सहकार्याने 'वंचितांचा रंगमंच' (the slum theatre) ची स्थापना. (२०१४)
- लोकशाही हक्क संघटना व गिरणी कामगार संघर्ष समिती यांच्याशी निगडीत कार्य.
- कुष्ठरोग निवारणासाठी कादंबरी व नाट्यलेखन-दिग्दर्शन, चर्चेत सहभाग.
- एड्स प्रतिबंधासाठी नाट्यलेखन, पुस्तक संपादन.
- अध्यक्ष, बालकुमार साहित्य संमेलन, पुणे. (२००१)
- संमेलनाध्यक्ष, कोकण मराठी साहित्य परिषद. मुंबई जिल्हा संमेलन (१९९८)
- लेखनाची ५० वर्षे पूर्ण केल्याबद्दल भरत नाट्य संशोधन मंदिर, पुणे यांच्याकडून सत्कार. (२००५)
- संमेलनाध्यक्ष, पहिले ई-साहित्य संमेलन, युनिक फीचर्स, पुणे. (२०१०)
- बृहन्महाराष्ट्र मंडळ USA यांच्या, शिकागो येथील १५ व्या अधिवेशनाचे प्रमुख वक्ते. (२०११)
- खालसा कॉलेजतर्फे ३ दिवसांचा, मतकरी - साहित्यावर सेमिनार - 'साहित्य रत्नाकर'. (२०१३)
- दादर माटुंगा कल्चरल सेंटर तर्फे ३ दिवसांचा सत्कार सोहळा. (२०१३)
- गंधार सन्मान (२०१६)
- कलकत्ता येथील रावा (रेनेसाँ अर्टिस्ट्स अँड रायटर्स असोसिएशन RAWA) सन्मान (२०१७)






पारितोषिके - पुरस्कार

- केंद्र शासनाचे डिरेक्टोरेट ऑफ कल्चर अँड एज्युकेशन, नवी दिल्ली, यांची, सामाजिक जाणिवेचा ज्येष्ठ रंगकर्मी म्हणून २ वर्षांची शिष्यवृत्ती. (१९८२, १९८३)
- महाराष्ट्र राज्य शासनाचे व इतर मिळून, २१ पुस्तकांना साहित्य पुरस्कार. तात्त्विक कारणांसाठी शासनाचे २ पुरस्कार नाकारले. त्यापैकी एका प्रीत्यर्थ संपादक ग. वा. बेहेरे यांचा 'स्वाभिमान पुरस्कार.'
- बाल रंगभूमीवरील कार्यासाठी, अ. भा. नाट्य परिषदेचे ज्योत्स्ना भोळे अॅवॉर्ड (१९७८)
- 'माझं घर... माझा संसार' या चित्रपटाच्या कथेसाठी शासनाचा फाळके पुरस्कार. (१९८६)
- उत्कृष्ट नाटककार म्हणून, देवल पारितोषिक (१९८५), अत्रे फाऊंडेशन पुरस्कार (१९८५), महाराष्ट्र शासनाचे गडकरी पारितोषिक (१९९५), शिरवाडकर पुरस्कार (२००२).
- गंगाधर गाडगीळ अॅवॉर्ड. (१९९७)
- सु. ल. गद्रे मातोश्री अॅवॉर्ड. (१९९८)
- नाट्यव्रती पुरस्कार. (१९९९)
- संगीत नाटक अकादमी अॅवॉर्ड. (२००३-०४)
- फाय फाऊंडेशन, इचलकरंजी, यांचा प्रतिष्ठेचा पुरस्कार. (२००५)
- महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका, यांचा, विशेष साहित्य गौरव पुरस्कार. (२००७)
- महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक पुरस्कार. (२०१०)
- दूरदर्शन 'साहित्य रत्न' पुरस्कार. (२०११)
- विष्णुदास भावे (सांगली) पुरस्कार. (२०११)
- दिग्दर्शित केलेल्या चित्रपटासाठी (सर्वोत्कृष्ट चित्रपट राष्ट्रीय पुरस्कारासह) रौप्यकमळ. (२०१२)
- दीनानाथ मंगेशकर पुरस्कार (२०१३)
- चतुरंग 'जीवन गौरव' पुरस्कार. (२०१४)
- मराठी व्यावसायिक उद्योजक व्यापारी मित्र मंडळातर्फे 'उद्योग भूषण' पुरस्कार. (२०१५)
- 'इंदिरा' या पुस्तकाला गोवा हिंदू असो.चा सुभाष भेंडे पुरस्कार. (२०१६)
- 'माझे रंगप्रयोग' या पुस्तकाला नगर वाचनालय, पुणे, यांचा इंदिरा भालचंद्र पुरस्कार. (२०१६)
- शांता शेळके जीवन गौरव पुरस्कार. (मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय)(२०१६)
- नालंदा डान्स रीसर्च सेंटरचा भरतमुनी सन्मान. (२०१७)
- साहित्य अकादमीचा पुरस्कार (२०१८): बालसाहित्याच्या योगदानासाठी.









I have watched some of his (Matkari's) theatrical productions during this period (of last four decades) and what has surprised me most is the freshness he has been able to maintain in his writings and production of his plays all these years. He has chosen theatre not merely as a bread winning profession but as a mission for the spread of dramatic art. Through his writings, direction and production of his plays he has achieved a standard which shows his native talent and untiring dedication to theatre.

- P. L. Deshpande

गेल्या चाळीस वर्षात मी मतकरीची काही नाटकं पाहिली. आणि सगळ्यात जास्त आश्चर्य वाटलं ते याचं, की इतक्या वर्षात तो आपल्या लिखाणात आणि निर्मितीमध्ये कायम टवटवीतपणा राखू शकला. रंगभूमी ही त्यानं पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून निवडलेली नसून ते त्यानं घेतलेलं नाट्य प्रसाराचं व्रत आहे. लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती यामध्ये त्यानं गाठलेला दर्जा, त्याचं अंगभूत कौशल्य आणि रंगभूमीवरील अथक निष्ठा दर्शविणारा आहे.

- पु. ल. देशपांडे





रत्नाकर मतकरी

७७६ अ, राधा निवास, टिळक रोड,
दादर, मुंबई - ४०० ०१४

Ratnakar Matkari

776 A, Radha Nivas. Tilak Road,
Dadar, MUMBAI 400 014

Tel. 2418 8383 Cell: 99303 07848 Email: pratibha.matkari@gmail.com

संरचना : मिलिंद जोशी, पुणे / मतकरींची व्यक्तिचित्रे व पुस्तकांची छायाचित्रे : सौरभ महाडिक, मुंबई

Design: Milind Joshi, Pune / Matkari's Portraits and group snaps of books: Saurabh Mahadik, Mumbai